भारत सरकार

**विधी, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# मीठ उपकर अधिनियम, १९५३

**(सन १९५३ चा अधिनियम क्रमांक ४९)**

[दिनांक २१ एप्रिल, २००३ रोजी यथाविद्यमान]

# The Salt Cess Act, 1953

**(Act No. 49 of 1953)**

**[ As in force on the 21st April, 2003]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

**[ किंमत : रु. ४.०० ]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २१ एप्रिल, २००३ रोजी यथाविद्यमान असलेला दि सॉल्ट सेस ॲक्ट, १९५३ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १२, अंक ३, दिनांक २ ऑक्टोबर, २००३ यात पृष्ठ १४८ ते १४९ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २ ऑक्टोबर, २००३.

**डॉ. सुभाष चंद्र जैन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the The Salt Cess Act, 1953 as on the 21st April, 2003 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 3, Volume 12, dated 2nd October, 2003 on pages 148 to 149.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

DR. SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

New Delhi,
Dated 2nd October, 2003.

# मीठ उपकर अधिनियम, १९५३

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. मीठावर उपकर आकारणे व वसूल करणे.

४. उपकराच्या आवकेचा विनियोग.

५. या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी मीठावर बसवलेले आकार विधिग्राह्य करणे.

६. नियम करण्याची शक्ती.

एच ४२४७—२ (१०३५—१–२००४)

# मीठ उपकर अधिनियम, १९५३

(१९५३ चा अधिनियम क्रमांक ४९)

(२१ एप्रिल, २००३ रोजी यथाविद्यमान)

[२६ डिसेंबर, १९५३]

शासनाने ठेवलेल्या मीठविषयक यंत्रणेवर आणि मीठाची निर्मिती, पुरवठा व वितरण यासंबंधात शासनाने केलेल्या उपाययोजनेवर येणारा खर्च भागवण्याकरिता पैसा उभा करण्यासाठी मीठावर उपकर आकारण्याचा व वसूल करण्याचा उपबंध करण्याकरता अधिनियम.

संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

१. (१) या अधिनियमास, 'मीठ उपकर अधिनियम, १९५३' असे म्हणावे. **संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

(२) त्याचा विस्तार [1]* * * संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र सरकार, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा [2][दिनांकास] तो अंमलात येईल.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— **व्याख्या.**

(क) मीठाच्या संबंधात 'निर्मिती' यात, गोळा करणे, हलवणे, तयार करणे, भिजवणे, बाष्पीभवन करणे, उकळणे किंवा यांपैकी एक प्रक्रिया किंवा अधिक प्रक्रिया, सोरमीठाची निर्मिती करताना मिळालेल्या मीठाचे विलगीकरण किंवा शुद्धीकरण, पोषक मीठ निर्माण व्हावे म्हणून मीठाचे मातीपासून किंवा अन्य पदार्थांपासून विलगीकरण, आणि नैसर्गिक लवणयुक्त पदार्थांचे साठे किंवा फुल/फुलोरा यांचे उत्खनन किंवा ते हलवणे याचा समावेश आहे आणि 'निर्माणक' या शब्दाचा अर्थ तद्नुसार लावला जाईल आणि मीठाच्या उत्पादनाच्या किंवा निर्मितीच्या कामी जी व्यक्ती भाडोत्री कामगार नेमते त्या व्यक्तीचाच नव्हे तर, मीठ विक्रीला ठेवण्याचा उद्देश असल्यास, जी स्वतःहून त्याचे उत्पादन किंवा निर्मिती करण्याच्या कामी लागलेली असते अशा व्यक्तीचाही त्यात समावेश आहे.

**स्पष्टीकरण.**—या खंडात, 'सोरमीठ' यामध्ये रसी, सज्जी आणि नैसर्गिक खारट मातीपासून निर्मिलेले अन्य सर्व पदार्थ आणि खरीनन आणि कोणत्याही स्वरूपात सापडणारे सोडियम सल्फेट किंवा सोडियम कार्बोनेट यांचा समावेश आहे.

(ख) 'मीठ' यात ओले मीठ, स्वयंभू मीठ आणि कोणत्याही लवणयुक्त पदार्थापासून किंवा खाऱ्या मातीपासून तयार केलेले किंवा उत्पादिलेले मीठ किंवा लवणाचे द्रावण यांचा समावेश आहे ;

(ग) 'मीठ कारखाना' यात,—

(एक) मीठाच्या निर्मितीसाठी वापरली जाणारी किंवा वापरण्यासाठी नियोजित असलेली जागा आणि केंद्रीय उत्पादन शुल्क आणि मीठ अधिनियम, १९४४ (१९४४ चा १) यांच्या प्रयोजनांपुरती वेळोवेळी जशी व्याख्या करण्यात येईल त्यानुसार अशा जागेच्या सीमांच्या आत असलेले सर्व बंधारे, जलाशय, संघनन आणि बाष्पीकरण वाफे, इमारती आणि पडीत जागा,

(दोन) अशा कोणत्याही जागेशी संबद्ध अशा सर्व वाळवणाच्या जमिनी व साठवणीचे चौथरे आणि कोठारे,

(तीन) जेथे मीठ आपोआप तयार होते अशी जमीन,

यांचा समावेश आहे, [1]* * *

[3]* * * * * * *

(ङ) 'विहित' याचा अर्थ, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे.

---

१. १९५६ चा अधिनियम ६२, कलम २ व अनुसूची यांद्वारे "जम्मू आणि काश्मीर राज्य खेरीज करून" हा मजकूर वगळण्यात आला.

२. २ जानेवारी १९५४, अधिसूचना एस. आर. ओ. २३७८, दिनांक २९ डिसेंबर १९५३ अन्वये पहा, **भारताचे राजपत्र**, असाधारण, १९५३, भाग दुसरा, विभाग ३, इंग्रजी पृष्ठ ३६०१.

३. १९६१ चा अधिनियम ३४, कलम २ (एक) आणि (दोन) अन्वये "आणि 'खाजगी मीठ कारखाना म्हणजे सर्वस्वी केंद्र सरकारच्या मालकीचा नसलेला किंवा सर्वस्वी केंद्र सरकारकडून ज्याचे काम चालवले जात नाही असा (मीठ कारखाना) असतो" हा मजकूर व खंड (घ) वगळण्यात आला.

[1][मीठावर उपकर आकारणे व वसूल करणे. ३. भारतातील कोणताही मीठ कारखाना शासनाच्या मालकीचा असो वा नसो त्यात निर्मिलेल्या मीठावर उत्पादनशुल्काच्या स्वरूपात दर चाळीस किलोग्रॅमला चौदा पैसे या दराने उपकर आकारला जाईल व विहित केला असेल त्या पद्धतीने तो वसूल करण्यात येईल.]

उपकराच्या आवकेचा विनियोग. ४. या अधिनियमाखाली आकारलेल्या शुल्कापासूनची आवक, केंद्र सरकारने ठरवल्याइतका वसुलीचा खर्च तीतून वजा जाता, संसदने या संबंधातील विधीनुसार केलेल्या विनियोजनाद्वारे तसा उपबंध केला तर, पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही उद्दिष्टांसाठी उपयोगात आणली जाईल, ती अशी,—

(क) केंद्र सरकारने ठेवलेल्या मीठ संघटनेच्या संबंधात येणारा खर्च भागवणे;

(ख) संघाच्या यंत्रणामार्फत मीठाची निर्मिती, पुरवठा व वितरण यांच्या संबंधात व अन्य यंत्रणामार्फत होणारी मीठाची निर्मिती, पुरवठा व वितरण यांचे नियमन व नियंत्रण यांच्या संबंधात केल्या जाणाऱ्या योजना व विशेषत:—

(एक) संशोधन केंद्रे व नमुनेवजा मीठ क्षेत्रे स्थापन करणे व ठेवणे ;

(दोन) मीठ कारखाने स्थापन करणे, ठेवणे व त्यांचा विस्तार करणे ;

(तीन) मीठाची प्रतवारी निश्चित करणे ;

(चार) मीठ निर्माणकांमधील सहकारी प्रयत्नांची अभिवृद्धी करणे व त्याला उत्तेजन देणे ; आणि

(पाच) मीठाच्या धंद्यात रोजगारावर असलेल्या कामगारांची हितवृद्धी करणे ;

यांसाठी केल्या जाणाऱ्या योजना यांचा खर्च भागवणे.

या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी मीठावर बसवलेले आकार विधिग्राह्य करणे. ५. केंद्र सरकारने केंद्रीय उत्पादनशुल्क व मीठ अधिनियम, १९४४ याच्या कलम ३७ खाली केलेल्या व पूर्वीच्या वित्त विभागाची (महसूल संभाग) दिनांक २९ मार्च १९४७ ची अधिसूचना क्रमांक ३ यासह प्रकाशित झालेल्या नियमाद्वारे मीठाच्या निर्मितीसंबंधात किंवा उत्पादनासंबंधात बसवलेला आकार ज्या दिनांकास बसवण्यात आला त्या दिनांकास हा अधिनियम जणू काही अंमलात असावा त्याप्रमाणे या अधिनियमाखाली तो आकारण्यात आला असल्याचे मानण्यात येईल व त्याप्रमाणे,—

(क) अशा आकाराच्या रूपाने दिलेली किंवा प्रदेय असलेली कोणतीही रक्कम विधीनुसार देण्यात आल्याचे किंवा प्रदेय असल्याचे मानले जाईल, आणि

(ख) याप्रमाणे दिलेल्या कोणत्याही रकमेसाठी कोणत्याही न्यायालयात दावा मांडता येणार नाही.

नियम करण्याची शक्ती. ६. (१) केंद्र सरकारला या अधिनियमाची प्रयोजने साध्य करण्यासाठी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषत: व पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाधा न येता, अशा नियमांमध्ये पुढील गोष्टींसाठी तरतूद करता येईल, त्या अशा :—

(क) या अधिनियमाखाली आकारलेल्या उपकराचे निर्धारण व वसुली,

(ख) उपकराच्या वसुलीचा खर्च ठरवणे,

(ग) उपकरापासूनच्या आवकेसंबंधीचा हिशेब कशा रीतीने ठेवला जाईल,

(घ) उपकराच्या आवकेचा कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या उद्दिष्टांसाठी कशा रीतीने विनियोग केला जाईल,

(ङ) (एक) भारतातून निर्यात केलेल्या मीठासंबंधात;

(दोन) कोणत्याही विनिर्दिष्ट वर्गातील छोट्या उत्पादकांनी कोणत्याही निर्मिलेल्या मीठासंबंधात ;

(तीन) अन्य कोणत्याही औद्योगिक उत्पादनाची निर्मिती करताना वापरलेल्या मीठासंबंधात;

या अधिनियमाखाली आकारलेल्या संपूर्ण उपकरापासून किंवा त्याच्या एखाद्या अंशापासून सूट देणे.

[2][(३) केंद्र सरकारने या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यावर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने किंवा [3][दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर,] त्या नियमात कोणतेही बदल, आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही. तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनांमुळे किंवा शून्यीकरणांमुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाधा येणार नाही.]

---

१. १९६१ चा अधिनियम ३४, कलम २ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम समाविष्ट करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ४ अन्वये पोटकलम (३) समाविष्ट करण्यात आले.

३. १९८६ चा अधिनियम ४, कलम २ व अनुसूचीद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला (१५ मे, १९८६ रोजी व तेव्हापासून).

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई